SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.
Affiliation No. 1130703
Academic session 2024-25
NOTES-2(TERM-2/PT-3)

Std. : 4th Subject: Marathi
Prepared by: Pallavi Surve LESSON- ९बचतीचे महत्त्व-संवाद

*__पूर्व उपक्रम__ –

तुम्ही तुम्हाला मिळालेल्या खाऊच्या पैशाचे काय करता ते लिहा.

**अ)पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१)अमित दिवाळीच्या सुट्टीत कुठे गेला होता ?

उत्तर-अमित दिवाळीच्या सुट्टीत मामाच्या गावाला गेला होता.

२. अमितच्या आजोबांनी नातवंडांना काय भेट दिली?

उत्तर -अमितच्या आजोबांनी नातवंडांना नवीन कपडे घेतले .

३.अमित बाबांनी दिलेले पैसे काय करत असे?

उत्तर -अमित आवडेल ती खेळणी आणि खाऊ बाबांनी दिलेल्या पैशातून घेत असे.

४. सोहम साठवलेल्या पैशाची काय करतो?

उत्तर -सोहम साठवलेले पैसे आईने आणलेल्या पिगी बँकेत साठवतो .दर दिवाळीला अनाथ मुलांना तो साठवलेल्या पैशातून पुस्तके, खेळणे किंवा इतर उपयोगी वस्तू देतो.

५. अमित ने पैशाचे काय करायचे ठरविले ?

उत्तर- बचत केलेल्या पैशाचा उपयोग गरजू मुलांसाठी करण्याचे अमितने ठरवले.

**आ) कोण कोणास म्हणाले?**

१."आम्ही सर्व भावंडांनी खूप मजा केली फटाके वाजवले."

उत्तर- अमित सोहमला म्हणाला.

२. "तू ते पैसे साठवून ठेवत नाहीस का?"

उत्तर- सोहम अमितला म्हणाला.

३. "अशा काही मुलांना माझ्या साठवलेल्या पैशातून पुस्तके खेळणी किंवा इतर उपयोगी वस्तू देतो."

उत्तर -सोहम अमितला म्हणाला.

४." बचतीचा उपयोग गरजू मुलांसाठी करणार, धन्यवाद मित्रा!"

उत्तर- अमित सोहमला म्हणाला.

**उपक्रम- तुम्ही दिवाळीच्या सुट्टीत काय केले ते लिहा.**

S.TEACHER HOD COORDINATOR PRINCIPAL